जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २५ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या अंतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेतील एम.सी.ए., एम.एस्सी. (संगणकशास्त्र) आणि एम.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान) या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी पँथर नेल्स आणि आरबीआयएस टेक्नॉलॉजी प्रा. लि., पुणे या नामांकित कंपन्यांच्या परिसर मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते.

संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी घेतलेल्या मुलाखतींमध्ये आरबीआयएस टेक्नॉलॉजी प्रा. लि., पुणे या कंपनीसाठी कांचन वाघ आणि सुमित पवार, तर पँथर नेल्स कंपनीसाठी ऋषिकेश पाटील आणि प्रक्षिक बोदडे यांची निवड झाली. निवड झालेल्या चारही विद्यार्थ्यांची संबंधित कंपन्यांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सुरुवातीला त्यांना सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना चांगल्या वार्षिक पॅकेजवर नियुक्त केले जाणार आहे.

या परिसर मुलाखतींच्या व्यवस्थापनाची जबाबदारी नियुक्ती अधिकारी सोनाली दायमा, आंतरवासिता समन्वयक संदीप कुमार आणि संगणकशास्त्र प्रशाळेचे नियुक्ती समन्वयक प्रा. अजय पाटील यांनी पार पाडली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील आणि उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २५ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे सत्यशोधक समाज स्थापना दिनानिमित्त दि. २४ सप्टेंबर रोजी 'मी ज्योतीराव फुले बोलतोय' या विषयावर एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन सामाजिकशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात करण्यात आले. राजेंद्र माळी, वाघळीकर यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांची भूमिका साकारत त्यांच्या जीवनकार्याचा आणि सामाजिक विचारांचा प्रभावी वेध घेतला.

या एकपात्री नाट्यप्रयोगात सादरकर्ते राजेंद्र माळी, वाघळीकर यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांची भूमिका साकारत त्यांच्या जीवनप्रवासाचा आणि सामाजिक कार्याचा प्रभावीपणे वेध घेतला. ज्योतिराव फुले यांच्या बालपणापासून सुरू झालेला सामाजिक जाणीवेचा प्रवास, स्त्रीशिक्षण, शूद्र-अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य, सामाजिक विषमतेविरुद्धचा संघर्ष, सावित्रीबाई फुले यांच्यासोबत केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य तसेच १८७३ मध्ये स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची उद्दिष्टे आणि त्यामागील विचार यांचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी केले. त्यांनी महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती देत विचारधारा प्रशाळेअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी अध्यक्षीय भाषणात सत्यशोधक समाजाच्या विचारांचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर झालेला प्रभाव स्पष्ट केला. तसेच मुक्ताबाई साळवे यांनी महात्मा फुले यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत तत्कालीन सामाजिक व्यवस्थेवर उपस्थित केलेले प्रश्न आणि त्यांच्या 'मांग-महारांच्या दुःखाविषयी निबंधा'चे महत्त्व अधोरेखित केले.

नाट्यप्रयोगातून स्त्रीशिक्षण, शूद्र-अतिशूद्रांचे शिक्षण, सामाजिक समता, विवेकनिष्ठता आणि सामाजिक परिवर्तनासाठी महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचा प्रभावीपणे परिचय करून देण्यात आला. खेमराज पाटील यांनी सूत्रसंचालन तर सुकन्या जाधव यांनी आभार मानले. विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

…………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २५ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**